# MAHARASHTRA ACT No. XL OF 1989

## THE BOMBAY UNIVERSITY (TEMPORARY POSTPONEMENT OF ELECTION OF UNIVERSITY REPRESENTATIVES) ACT, 1989

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ३१ ऑक्टोबर १९८९, रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डी. एन. चौधरी,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. XL OF 1989

## AN ACT TO PROVIDE FOR TEMPORARY POSTPONEMENT OF ELECTION OF THE UNIVERSITY REPRESENTATIVES ON THE STUDENTS' COUNCIL OF THE UNIVERSITY OF BOMBAY

(राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक ३ नोव्हेंबर १९८९, रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

## सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०

**मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी परिषदेवरील विद्यापीठ प्रतिनिधींच्या निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

१९७४ चा महाराष्ट्र २२. **ज्याअर्थी**, मुंबई विद्यापीठ अधिनियम, १९७४ याच्या कलम ३४ मध्ये इतर गोष्टींबरोबर वर्ग प्रतिनिधींकडून निवडण्यात येणाऱ्या विद्यापीठ प्रतिनिधींचा समावेश असलेल्या विद्यार्थी परिषदेची स्थापना करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे;

**आणि ज्याअर्थी**, विद्यापीठ प्रतिनिधी निवडण्यासाठी निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली होती आणि ७ ऑक्टोबर १९८९ रोजी वर्ग प्रतिनिधी त्यांची निवड करणार होते;

**आणि ज्याअर्थी**, दुर्दैवाने निवडणुकीचा कैफ चढल्यामुळे घडलेल्या हिंसककृत्यांचे पर्यवसान एका विद्यार्थ्याच्या भीषण खुनामध्ये झालेले होते आणि या निवडणुका घेण्याइतके वातावरण हितकारक राहिलेले नव्हते;

**आणि ज्याअर्थी**, मुंबई विद्यापीठाने परिस्थिती धोकादायक होती आणि म्हणून या निवडणुका घेणे उचित नाही असे कळवले होते ;

**आणि म्हणून ज्याअर्थी**, शासनाला विद्यापीठ प्रतिनिधींच्या निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे इष्ट आहे असे वाटले होते ;

**आणि ज्याअर्थी**, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

**आणि ज्याअर्थी,** मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी परिषदेवरील विद्यापीठ प्रतिनिधींच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्यासाठी कायदा करण्याची तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक झाले होते अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती, आणि म्हणून त्यांनी दिनांक ६ ऑक्टोबर १९८९ रोजी मुंबई विद्यापीठ (विद्यापीठ प्रतिनिधींच्या निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९८९ प्रख्यापित केला होता ; १९८९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास "मुंबई विद्यापीठ (विद्यापीठ प्रतिनिधींच्या निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९८९" असे म्हणता येईल.

(२) तो दिनांक ६ ऑक्टोबर १९८९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी परिषदेवरील विद्यापीठ प्रतिनिधींच्या निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे.

२. मुंबई विद्यापीठ अधिनियम, १९७४ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुंबई विद्यापीठ अधिनियम" असा करण्यात आलेला आहे) आणि त्याखाली केलेले कोणतेही परिनियम यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या प्रारंभापासून ३१ डिसेंबर १९८९ ही तारीख धरून तोपर्यंतच्या अथवा राज्य शासन, विद्यापीठाच्या शिफारशीवरून **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अगोदरच्या तारखेपर्यंतच्या कालावधीमध्ये (या अधिनियमामध्ये ज्याचा निर्देश "उक्त कालावधी" असा करण्यात आलेला आहे), मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी परिषदेवरील विद्यापीठ प्रतिनिधींच्या कोणत्याही निवडणुका घेण्यात येणार नाहीत. १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.

विद्यापीठ प्रतिनिधींच्या निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकल्यामुळे होणारे परिणाम.

३. मुंबई विद्यापीठ अधिनियम किंवा त्याखाली केलेले परिनियम यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम २० चे पोट-कलम (१), खंड (ब), उपखंड (सात) मध्ये उल्लेख केलेले कोणतेही किंवा सर्व सदस्य अधिसभेवर नाहीत केवळ याच कारणास्तव अधिसभेची उक्त कालावधीमधील कोणतीही कृती किंवा कार्यवाही विधि अग्राह्य ठरणार नाही.

१९८९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.८ यांचे निरसन व व्यावृत्ती.

४. (१) मुंबई विद्यापीठ (विद्यापीठ प्रतिनिधींच्या निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९८९ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. १९८९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ८.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही उक्त अध्यादेशाअन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कारवाई ही जणू काही या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये केलेली यथास्थिति, कृती किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)
**प. ग. पाटील**
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.